International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# वाढती बेरोजगारी एक समाजशास्त्रीय अध्ययन

**प्रा. किशन काशिनाथ घोगरे**

समाजशास्त्र विभाग,लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी,जि. यवतमाळ

**प्रस्तावना:**

औद्योगिक क्रांती पूर्वी शेती हाच लोकांचा प्रमुख व्यवसाय होता. शेती व्यवसायाच्या जोडीला कुटिर उद्योग होते. आजच्या 21 व्या शतकाच्या तुलनेत लोकसंख्या मर्यादित होती. लोकांच्या गरजा पण मर्यादित होत्या, त्या कृषीप्रधान अर्थव्यवस्थेच्या काळात बेरोजगारीची समस्या नव्हती. याच शतकाच्या अंतिम प्रवाहात लोकसंख्येत जलद गतीने वाढ होऊ लागली, कुटीर व हस्तउद्योगातील वस्तू अपुऱ्या पडू लागल्या आणि मागणी-पूर्वठ्यातील संतुलन बिघडले समतोल साधण्यासाठी वस्तूचा पुरवठा वाढवणे भाग पडले. “गरज ही शोधाची जननी म्हणतात." वाढत्या लोकसंख्येमुळे लोकांना वस्तूचा पुरवठा करण्यासाठी मानवाने यंत्र निर्माण केली. यंत्र उत्पादित उत्पादनाला सुरुवात झाली. पशुबाह्य ऊर्जेचा उपयोग करून यंत्र उत्पादित उत्पादनाला सुरुवात झाली. त्यामुळे वस्तूच्या उत्पन्नात वाढ झाली. औद्योगिक अर्थव्यवस्थेच्या युगाचा प्रारंभ झाला. यंत्राने निर्माण केलेले उत्पादननात वाढ झाली होती. यामुळे यंत्र उत्पादित उत्पादन काही कालावधी करीता थांबवणे भाग पडले. त्यामुळे मंदीची लाट आली बेरोजगारी वाढली, यानंतरच्या काळात मात्र मंदीची लाट समाप्त झाली. पण बेरोजगारीची समस्या मात्र समाप्त झाली नाही. उद्योग प्रधान भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या युगात बेरोजगारांची समस्या ही त्याच अर्थव्यवस्थेचा भाग झाली.

आज बेरोजगारीची समस्या अविकसित, विकसनशील आणि विकसित अशा सर्वच देशांमध्ये निर्माण झाली आहे. अर्थात प्रत्येक राष्ट्रातील बेरोजगारीचे स्वरूप वेगवेगळे आहे. भारतात ब्रिटिश राजवट सुरू झाली गृहउद्योग कुटीरउद्योग बंद पडले. कारण यंत्र उत्पादित उद्योग सुरू झाले होते. कृषीचावरचा भार वाढला बलुतेदारी पद्धती बंद झाली. स्वातंत्र्य पूर्वकाळातच बेरोजगारीच्या समस्येचे भारतात आगमन झाले. आता पुन्हा बेरोजगारीच्या समस्येने उग्र स्वरूप धारण केले आहे. भारतीय समाजाच्या संदर्भात बेरोजगारीच्या समस्येचे समाजशास्त्रीय विश्लेषण करता येईल.

भारतातील बेरोजगारीचा दर सीएमआयई च्या रिपोर्टनुसार शहरी भागातील बेरोजगारीचा दर हा डिसेंबर 2022 मध्ये 10.9% हा झाला आहे. आणि ग्रामीण भागातील बेरोजगारीचा वृद्धीदर हा 7.44% असा आहे. सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनोमी या खाजगी संस्थेच्या अहवालानुसार सध्या भारतातील बेरोजगारीचा दर हा 8.3% आहे. भारतातील शहरी भागाचा बेरोजगारी वृद्धी दर 10.9% आहे. व भारतातील ग्रामीण भागातील बेरोजगारीचा वृद्धीदर केवळ 7.44% आहे. पंधरा वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वय असणाऱ्या लोकांची आणि शहरी भागात 7.2% भागातील महिला 15 वर्षापेक्षा अधिक असणाऱ्या चा बेरोजगारी दर 9.4% आहे. व पुरुषांचा दर 6.6% आहे 1 जानेवारी 2023 सीएमआईच्या अहवालानुसार भारतातील सर्व राज्यातील बेरोजगारीचा दर आंध्रप्रदेश 7.7%, महाराष्ट्र 3.1%, आसाम 4.7%, मेघालय 2.7%, बिहार 19.1%, ओडीसा 0.9%, छत्तीसगढ 3.4%, उद्दुचेरी 4.7%, दिल्ली 20.8%, पंजाब 6.8%, गोवा 9.9%, राज्यस्थान 28.5%, गुजरात 2.3%, सिक्कीम 13.6%, हरियाणा 37.4%, तामिळनाडू 4.1%, हिमाचल प्रदेश 7.6%, तेलंगाना 4.1%, जम्मू आणि काश्मीर 18.8%, त्रिपुरा 14.3%, झारखंड 18.0% उत्तराखंड ४.२% केरळ 7.4% पश्चिम बंगाल 5.5%, आणि मध्य प्रदेश 3.2% असा एकूण भारतातील सर्व घटक राज्यातील बेरोजगारीचा दर असलेला आपल्याला दिसून येतो. भारतातील सर्वात अधिक बेरोजगारीचा दरामध्ये जानेवारी 2022 ला वाढ झाली. त्यापेक्षाही डिसेंबर 2022 ला सर्वात अधिक म्हणजे मे 2022 मध्ये 37.1% बेरोजगारीचा दर वाढलेला दिसून येतो. राजस्थानमध्ये 28.5%, दिल्ली 20.8% आणि हरियाणा सर्वात अधिक 37.4% बेरोजगारीचा दर आपल्याला दिसून येतो.

**गुननार मिडॉरल**

"बेरोजगारी ही ऐच्छिक नसून अनैच्छिक आहे"

**डिमेलो**

"बेरोजगारी ही अशी अवस्था आहे की ज्यात व्यक्ती काम करण्याची इच्छा असूनही आर्थिक मोबदला मिळवून देणारे काम भेटण्याची स्थिती नसते."

International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com
ICMRS'23

**आंतरराष्ट्रीय श्रम संघटना**

"ज्या व्यक्तीला एका आठवड्यात पाच दिवसाचा किमान 15 तासापेक्षा जवळपास दोन दिवस कमी काम मिळते अशी व्यक्ती बेरोजगार होय."

रोजगारी आणि बेरोजगारी चे मापन करता यावे यासाठी कामगाराचे मुख्य कामगार व सीमांत कामगार असे प्रमुख दोन प्रकार पाडले जातात. वर्षातील 183 दिवस किंवा 6 महिन्यापेक्षा जास्त काळासाठी रोजगाराची संधी मिळत असेल तर तो मुख्य कामगार आणि जो 183 दिवसापेक्षा कमी काळासाठी रोजगाराची संधी प्राप्त होत. असेल तर तो सीमांत कामगार होय. मुख्य कामगार व सीमांत कामगार सोडून इतर सर्व रोजगार क्षमता धारकांचा समावेश बेरोजगारांमध्ये केला जातो. आर्थिक विकासाची गती राष्ट्रीय उत्पन्नात मध्ये होणारी वाढ किंवा घट आणि इतर काही घटकांच्या घटकाबाबतच्या आकडे वारीवरून देशातील रोजगार आणि बेरोजगारांच्या एकूण स्थिती लक्षात येते.

**उद्दिष्टे:**

1. बेरोजगारांच्या स्थिती जाणून घेणे.
2. बेरोजगारांच्या परिस्थितीचा आढावा घेणे.
3. बेरोजगारीच्या समस्येमुळे निर्माण स्थितीचा आढावा घेणे.

**गृहीतकृत्ये**

1. बेरोजगाराची समस्येचा अभ्यास करणे.
2. बेरोजगारीच्या कारणांचा अभ्यास करणे.
3. वाढत्या बेरोजगारीमुळे निर्माण होणाऱ्या प्रश्नांचा अभ्यास करणे.
4.वाढत्या बेरोजगारी समस्येच्या वास्तव स्थितीचा आढावा घेणे.

**संशोधन आराखडा**

वाढती बेरोजगारी एक समाजशास्त्रीय अध्ययन या उपरोक्त संशोधन विषयासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडा आणि त्याचबरोबर विश्लेषणात्मक आराखड्याचा उपयोग करण्यात आला आहे. तर साहित्याचे संकलन करून विश्लेषण करण्यात आले आहे. माहिती प्राप्त करण्यासाठी प्राथमिक आणि दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. विविध पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे, क्रमिक पुस्तके, इंटरनेट चर्चासत्रे इत्यादी साधनांच्या साह्याने माहिती प्राप्त करण्यात आली आहे.

**बेरोजगारीचे प्रकार**

हंगामी बेरोजगारी, चक्राकार स्वरूपाची बेरोजगारी, औद्योगिक बेरोजगारी, तांत्रिक बेरोजगारी, तात्पुरती बेरोजगारी, ऐच्छिक बेरोजगारी आणि अनैच्छिक बेरोजगारी इत्यादी बेरोजगारीचे प्रकार भारतीय हे समाजात दिसून येतात.

**बेरोजगारीची कारणे**

कोणत्याही राष्ट्रात बेरोजगारांची अवस्था कोणत्याही एका कारणामुळे निर्माण होत नाही. ती अनेक कारणांच्या एकत्रित प्रभावातून निर्माण होते. बेरोजगारी ही आर्थिक कारणे, सामाजिक कारणे व वैयक्तिक या करणामुळे बेरोजगारीची समस्या निर्माण होते.

**आर्थिक कारणे**

बचतीचे अल्प प्रमाण, भांडवलाचा अभाव, मोठ्या प्रमाणावरील उत्पादन यासारखे आर्थिक कारणेच बेरोजगारीस कारणीभूत असल्याचे मत अर्थशास्त्राचे अभ्यासक व्यक्त करतात. औद्योगिक समृद्धीनंतर म्हणजे मोठ्या प्रमाणावर उत्पादन सुरू झाल्यानंतर काही काळाने व्यापार चक्रात मंदीची लाट येते. जागतिक स्तरावर दोन वेळा मंदीच्या लाटेचा अनुभव मानव जातील आला आहे. हेच बेरोजगारीचे प्रमुख कारण होय. उद्योगधंद्यामधील अव्यवस्था आणि बाजारपेठेतील वस्तूच्या मागणीचे संभाव्य स्वरूप निश्चित करण्यामधील असमर्थता हे बेरोजगारीचे कारण आहे. कोणत्याही वस्तू बाबत भविष्यकाळात मागणीचे स्वरूप काय राहील याचा अंदाज बांधणे अतिशय अवघड असते. हा अंदाज चुकू शकतो आणि असे घडल्यास व्यापारात नुकसान होते. त्यामुळेच बेरोजगारी निर्माण होते.

**आर्थिक वृद्धीची मंद गती**

आर्थिक विकासातूनच रोजगारांची निर्मिती होत असते. म्हणून आर्थिक वाढीची मंदगती हे बेरोजगार निर्माण होण्याचे आर्थिक कारण आहे.

**औद्योगिकीकरणाची मंद गती**

कृषी क्षेत्रापेक्षा औद्योगिक क्षेत्रात प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष असे दोन्ही प्रकारचे निर्माण करण्याची क्षमता अनेक पटीने जास्त आहे. म्हणून औद्योगिककरण्याची मंद गती हे, बेरोजगारी निर्माण करण्याचा एक कारण आहे.

**बचत व गुंतवणूक कमी**

भांडवल हे बचतीतून निर्माण होते. भांडवलाची गुंतवणूक गेल्याशिवाय औद्योगिक व कृषी विकास होऊ शकत नाही. म्हणून बचत व गुंतवणूक कमी असणे हे बेरोजगार निर्माण होण्याचे कारण आहे.

**लघु व कुटीर उद्योगांचे मागासलेपण**

मोठ्या औद्योगिक उद्योगापेक्षा लघु व कुटीर उद्योगांमध्ये रोजगार निर्मितीची क्षमता अधिक असते. लघु व कुटीर उद्योगाची निर्मिती करण्यासाठी वेळ कमी लागतो भांडवल ही कमी लागते. परंतु काही धोरणात्मक स्वरूपाचे निर्णय शासनाने घेतल्याशिवाय त्याचा विकास होऊ शकत नाही. परंतु शासनाने त्यांच्या विकासाकडे पुरेसे लक्ष दिले नाहीत. यामुळे कुटीर व लघु उद्योगाचे मागासलेले पण हे बेरोजगारीच्या निर्मितीसाठीचे कारण आहे.

**कृषी विकासाकडे दुर्लक्ष:**

स्वातंत्र्य उत्तर काळात औद्योगिक विकास घडवून आणण्याच्या नादात कृषी विकासाकडे दुर्लक्ष झाले. औद्योगिक विकास आणि कृषी विकास या दोन्ही मध्ये समतोल साधता आले नाही. शेती निसर्गावर अवलंबून राहिली प्रतिकूल निसर्गाचा सतत फटका कृषी क्षेत्राला बसत गेल्यावर शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या प्रमाणात होऊन वाढ झाली. कोरडवाहू जमिनीपेक्षा सिंचनाच्या सोयी निर्माण झाल्या तर अधिक रोजगार निर्माण होतो. कृषी विकासाकडे दुर्लक्ष हे बेरोजगारीच्या संख्येत वाढ होण्याचे एक महत्त्वाचं कारण आहे.

**कृषी माल प्रक्रिया उद्योगाचा अभाव**

कृषीमाल नाशवंत आहे त्याच्यावर प्रक्रिया करण्याच्या उद्योगाचे जाळे निर्माण झाले. की नाशिवंत कृषी उत्पन्नाचे नुकसान होत नाही. शेतकऱ्यांना कृषी उत्पन्नाची योग्य किंमत मिळते. त्यापेक्षाही अधिक महत्त्वाचे म्हणजे कृषी मालावरवर प्रक्रिया उद्योगातून प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगाराची मोठ्या प्रमाणावर निर्मिती करता येते. कृषी मालावर प्रक्रिया उद्योगाचा अभाव हे ग्रामीण भागात बेरोजगारीची वाढ होण्याचे आर्थिक कारण आहे.

**रोजगाराच्या संधीचा अभाव असणारा आर्थिक विकास**

स्वातंत्र्योत्तर काळात भारतात आर्थिक विकास झाला. परंतु त्या पुरेशा प्रमाणात रोजगाराची निर्मिती झाली नाही. रोजगारांच्या संधीचा अभाव असणारा आर्थिक विकास हेच बेरोजगारीची समस्या निर्माण होण्याचे एक प्रमुख कारण आहे.

**सामाजिक कारणे**

**लोकसंख्या वाढ**

जन्मदर अधिक असणे हे लोकसंख्या वाढीचे प्रमुख कारण आहे. लोकसंख्या वाढीचा उपलब्ध रोजगाराच्या संधीवर प्रत्येक प्रतिकूल प्रभाव होतो. 25 ते 30 वर्षांपूर्वी शिक्षित व्यक्तीला आपल्या आवडीनिवडीनुसार रेल्वे, पोस्ट, बँक व शिक्षक यासारख्या कोणत्याही एका विशिष्ट क्षेत्रात रोजगार मिळवण्याची संधी होती. आज शिक्षित व्यक्तीवर आपल्या आवडीनिवडी बाजूला ठेवून मिळती नोकरी स्वीकारण्याची वेळ त्याच्यावर आली आहे. लोकसंख्या वाढीमुळे शिक्षित व्यक्तीला नोकरी मिळवणे हे पूर्वी कधी नव्हते एवढे आज दुर्लभ झाले आहे. म्हणून बेरोजगारीची अवस्था निर्माण होण्याचं महत्त्वपूर्ण कारण लोकसंख्या वृद्धी हेच आहे.

**भौगोलिक गतिशीलतेचा अभाव**

रोजगार प्राप्त होण्याच्या संधीसाठी आपले गाव, जिल्हा, प्रदेश सोडून न जाण्याची मानसिकता असा भौगोलिक क्षेत्र भौगोलिक गतिशील ते चा अर्थ आहे. भौगोलिक गतिशीलतेचा अभाव हा सुद्धा बेरोजगारी निर्माण होण्यासाठी एक कारण आहे.

**सदोष शिक्षण पद्धती**

प्रचलित शिक्षण पद्धतीत श्रमप्रतिष्ठा तुझ्या मूल्याची योग्यपणे जोपासना केली जात नाही. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर कष्ट करण्याची तयारी असणारा स्वयंरोजगार मिळवण्यापेक्षा नोकरी मिळवण्याकडे बहुतांश शिक्षित युवकांचा कल दिसून येतो. प्रत्येकाला नोकरी करण्याची संधी मिळणे अशक्य आहे. हे समजत असूनही त्याचा कष्ट करण्याकडे कल झुकत नाही. कारण मुलांमध्ये शारीरिक कष्ट करण्याबाबत एक प्रकारची उदासीनता प्रचलित शिक्षण पद्धती निर्माण होत आहे. याशिवाय तात्विक किंवा सिद्धांतिक बाजूवर अधिक भर आणि व्यवहार उपयोगी बाजूकडे दुर्लक्ष या प्रचलित शिक्षण पद्धतीमधील दोष बेरोजगारीची अवस्था निर्माण करण्यास कारणीभूत ठरत आहे.

**अपमानजनक सामाजिक कार्य स्थिती**

काही व्यक्ती विशिष्ट व्यवसाय किंवा विशिष्ट काम करणे हे आपल्या प्रतिष्ठेच्या विरोधी आहे. असे त्यांना वाटते काही वर्षांपूर्वी रुग्णालयात परिचारिका म्हणून कार्य करणे हे कमीपणाचे आहे. असे अनेक मुलींना वाटत होते. परिणामी अनेक शासकीय रुग्णालयात परिचारिका कमतरता होती. आज या स्थिती बऱ्याच प्रमाणात बदल झाला आहे. आजही सुशिक्षित युवक फिरता विक्रेता म्हणून काम करणे हे अप्रतिष्ठेचे असे मानतात हे काम करण्यापेक्षा ते ऐच्छिक बेरोजगारी करण्यास तयार असतात. अशा प्रकारे बेरोजगारी निर्माण होण्यास एखाद्या कामासंबंधीच्या प्रतिष्ठेच्या कल्पना कारणीभूत ठरतात.

**जाती आणि त्यांचे पारंपारिक व्यवसाय**

मागील 70 ते 80 वर्षांपासून जातिव्यवस्थेत आणि बदल झाले आहेत. उदा. जातीचा पारंपारिक व्यवसाय करणे हा जातीच्या सदस्यावर बंधनकारक राहिले नाही. प्रत्येकाला स्वतःच्या इच्छेनुसार कोणत्याही व्यवसायाची निवड करण्याचे स्वातंत्र्य प्राप्त झाले आहे. परंतु आजच्या काळात ही नावी, धोबी, चांभार, माळी इ. व्यवसायामध्ये त्याच जातीच्या लोकांचे अधिक्य दिसून येतात. अन्य जातीचे सदस्य हे व्यवसाय करत नाहित. असतील तरी संख्या फार कमी आहे. अनेक समाजशास्त्रीय अभ्यासातून स्पष्ट झाले आहे. परिणामी बेरोजगारीच्या समस्येची तीव्रता कमी करण्यासाठी भारतातील पारंपरिक व्यवसायाचे सहाय्य होत नाही.

**वैयक्तिक कारणे**

**नवीन शिकण्याची इच्छा**

नवीन व्यवसाय करण्यासाठी आणि अनेकदा व्यवसायास सुरवात केल्यानंतर त्यात टिकून राहण्यासाठी काही नवीन गोष्टी सातत्याने शिकण्याची व त्यासाठी कष्ट करण्याची तयारी असायला हवी. कॅम्पुटर इंजिनियर असणाऱ्या युवकांनाही नोकरी व्यवसायात सतत नव्या गोष्टी शिकाव्या लागतात. असे प्रयत्न न करणाऱ्यावर त्याच्या नोकरी व्यवसायातून बाहेर पडण्याची पाळी येते नोकरी मिळवण्यासाठी सातत्य किंवा स्वतःच्या बळावर उद्योग व्यवसाय करण्यासाठी काही नवीन शिकण्याचे इच्छेचा व त्यासाठी कष्ट करण्यात या प्रयत्नाचा अभाव आहे. यामुळे सुद्धा बेकारीची समस्या निर्माण होत असते.

**स्वयंरोजगार**

आधुनिकीकरण, जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरण या प्रक्रियांमुळे नोकरी देण्याच्या उद्योग व्यवसायांच्या क्षमतेत घट होत आहे. अशा परिस्थितीत नोकऱ्यांची एकूण संख्या कमी झालेली असली तरीही स्वयंरोजगाराच्या संधी फार मोठ्या प्रमाणावर वाढल्या आहेत. वाढत आहेत नोकरी करणे ही मानसिकता बदलल्याशिवाय शिक्षित व कुशल तसेच अकुशल तरुणांना रोजगार मिळू शकत नाही. बेरोजगारीची समस्या दूर होऊ शकत नाही.

**भौगोलिक गतिशीलतेचा अभाव**

आपण ज्या ठिकाणी राहतो त्याच गावात, भागात किंवा आपल्या शहरांमध्ये रोजगाराची संधी मिळेलच असे नाही. रोजगार प्राप्त करण्यासाठी त्याला दुसऱ्या भागात जावे लागते. उदा. महाराष्ट्रामध्ये ट्यूब वेलची कामे करण्यासाठी देशातील वेगवेगळ्या भागातून मजूर येतात. यावरून भौगोलिक गतीविषयतेचा अभाव असेल तर रोजगारांची संधी मिळणे अवघड जाते हे स्पष्ट दिसून येते.

**गुण कौशल्य**

निरोगी, सशक्त, निर्व्यसनी, कष्ट करण्याची तयारी व संभाषण कौशल्य इत्यादी गुणांची नोकरी, उद्योगातvआणि व्यवसायात आवश्यकता असते. केवळ पुस्तकी शिक्षण किंवा प्रमाणपत्र असले म्हणजे नोकरी प्राप्त होतेच असे नाही. केवळ

International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

भांडवल आहे, म्हणून उद्योग व्यवसाय यशस्वी होईल असे नाही. त्यासाठी संबंधित व्यक्तीला स्वतःवर वरील उल्लेखित विविध प्रकारचे कौशल्य प्रयत्नपूर्वक आपल्या अंगी बाळगावी लागतात. वर उल्लेखित गुण एका दिवसात किंवा एका महिन्यात प्राप्त करता येत नाहीत. हे गुण प्राप्त करण्यासाठी ही एक अखंड आणि दीर्घकाळ सुरू असणारी प्रक्रिया आहे. निरोगी, सशक्त व काटक असल्याशिवाय केवळ शारीरिक कष्ट करण्याची तयारी नसणाऱ्या व्यक्तीला रोजगाराची संधी देखील प्राप्त शकत नाही.

**बेरोजगारीचे परिणाम**

बेरोजगारीमुळे मानवी संसाधनाची हानी होते. राहणी मानाचा दर्जा खालावतो, दारिद्र्यात आणि आर्थिक विषमतेत वाढ होते. आर्थिक भार सरकारला सहन करावा लागतो. जागतिक स्पर्धेत मागे पडतो. कामगाराचे शोषण होते. सामाजिक समस्येमध्ये वाढ होते. सामाजिक व राजकीय अस्थिरता निर्माण होते. वैयक्तिक, कुटुंब व समाज विघटन इत्यादी परिणाम बेरोजगारीमुळे समाजावर होतात.

**बेरोजगारी निर्मूलनाचे उपाय**

सामूहिक स्तरावरील प्रयत्नातूनच बेरोजगारीची समस्या कमी होऊ शकते. या सामूहिक स्तरावरील प्रयत्न सरकारचा प्रमुख वाटा असतो. महात्मा गांधी रोजगार हमी योजना ही प्रामुख्याने भारत शासनाने ग्रामीण भागातील बेरोजगारी कमी करण्यासाठी सुरू केली योजना आहे. सुशिक्षित तरुणांना रोजगार देण्यासाठी जवान रोजगार योजना सुरू करण्यात आली. शासकीय उपाययोजनामुळे बेरोजगारीची निर्मूलन झाले नसले तरीही या समस्येची तीव्रता काही क्रमांक कमी झाली आहे. हे मान्य करावे लागते बेरोजगारीचे निर्मूलन करण्यासाठी आर्थिक व सामाजिक स्वरूपाच्या उपायाचे विवेचन आपल्याला करता येईल.

**लोकसंख्या वाढीवर नियंत्रण**

जन्मदरात घट होण्यासाठी सातत्याने आणि अधिक तीव्र गतीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. लोकसंख्या वाढ थांबविल्याशिवाय बेरोजगारीच्या समस्येच्या निर्मूलन करणे व समस्येची तीव्रता कमी करणे शक्य नाही.

**बचत करण्यास प्रोत्साहन**

आधुनिक काळात कोणत्याही व्यवसायासाठी भांडवली खर्चात प्रचंड वाढ झाली आहे. भांडवलाची निर्मिती केल्याशिवाय आर्थिक विकास होऊ शकत नाही. भांडवलाची निर्मिती करण्याचा सर्वात उत्तम मार्ग म्हणजे लोकांना बचत करण्याची सवय लावणे होय.

**कुटीर व ग्राम उद्योगांना प्रोत्साहन**

मोठ्या उद्योगधंद्या उभारणी करण्यासाठी प्रचंड प्रमाणात भांडवलाची गुंतवणूक करावी लागते. मोठ्या उद्योगांमध्ये प्रत्यक्ष रोजगार येण्याची क्षमता बरीच कमी असते. कमी प्रमाणात भांडवल गुंतवणूक करून अधिक रोजगार देण्याची क्षमता व ग्राम उद्योगांमध्ये आहे. बेरोजगारीच्या निर्मूलन करण्यासाठी ग्राम उद्योगाचा विकास होईल अशा उपायोजना शासनाने करणे आवश्यक आहे.

**कृषी क्षेत्राचा विकास**

ग्रामीण भागात पुरेसे काम नसल्यामुळे लोक स्थलांतरित होऊन शहरात येतात. शहरांमध्ये औद्योगिक विकासाची गती मंद असते कोणतेही गुण कौशल्य किंवा विशेष क्षमता नसलेले अकुशल व कुशल कामगारांना पुरेसे उत्पन्न देणारे रोजगार मिळणे शहरांमध्ये अशक्य आहे. बेरोजगारी कमी करण्यासाठी कृषी भागाचा जलदगतीने विकास घडवून आणणे आवश्यक आहे. ग्रामीण क्षेत्रात शेतीमध्ये जलसिंचनाच्या सोयी अधिक प्रमाणात निर्माण होतील तेवढ्यात अधिक प्रमाणात कृषी क्षेत्राचा विकास होऊन रोजगाराची संधी निर्माण होईल.

**कृषी माल प्रक्रिया उद्योगाचा विकास**

कृषी मालाच्या प्रक्रिया उद्योगांमध्ये रोजगार संधी अधिक प्रमाणात निर्माण होण्याची क्षमता असते. भारतात औद्योगिक विकास बऱ्याच प्रमाणात झालेला असला तरीही कृषी उत्पन्न च्या प्रक्रिया उद्योगाचा पुरेसा विकास झाला नाही.

फळ-भाज्यावर प्रक्रिया करणारे कारखाने अधिक प्रमाणात निर्माण झाल्यास रोजगाराच्या संधीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होऊ शकते. कृषी मालावर प्रक्रिया उद्योगामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन. ग्रामीण क्षेत्रातील बेरोजगारी बेरोजगारीचे बऱ्याच प्रमाणात निर्मूलन करणे शक्य आहे.

**शिक्षण पद्धतीत सुधारणा**

श्रम प्रतिष्ठा या मूल्याची योग्य जोपासना करण्यासाठी शिक्षण पद्धतीत सुधारणा घडवून आणणे ही वर्तमान काळाची नितांत गरज झाली आहे. उद्योगधंद्याची गरज लक्षात घेऊन विशिष्ट गुण कौशल्य असणारे मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी शिक्षण पद्धतीत सुधारणा करणे आवश्यक आहे. अर्थव्यवस्थेची गरज लक्षात घेऊन उच्च शिक्षण घेण्याची संख्या मर्यादित करण्याची गरज निर्माण झाली आहे. अशा सुधारणा शिक्षण पद्धतीत घडून आल्यास शिक्षित बेरोजगारांच्या संख्येमध्ये बऱ्याच प्रमाणात घट होऊ शकते.

**सारांश**

अशाप्रकारे वरील विश्लेषणाच्या आधारे आपल्याला वाढती बेरोजगारी हा विषय स्पष्ट करता येते. वाढती बेरोजगारीची समस्या जगातील सर्वच राष्ट्रात दिसून येते. राष्ट्र अविकसित, विकसनशील किंवा विकसित असो सर्वच राष्ट्रांमध्ये बेरोजगारीची समस्या आढळून येते. भारतात सुद्धा आपल्याला दिसून येत आहे. अलीकडील काळात वाढती बेरोजगारी च्या समस्यांनी गंभीर रूप धारण केलेला आहे. बेरोजगारी ही काळ परत्वे देशप्रत्वे भिन्न प्रकारचे असते. कामगाराचे मुख्य दोन प्रकार आहेत. प्रमुख कामगार, सीमांत कामगार आहेत. बेरोजगारीचे प्रकार आहेत हंगामी बेरोजगार, चक्राकार स्वरूपाची बेरोजगारी, औद्योगिक बेरोजगारी, तांत्रिक बेरोजगारी, तात्पुरती बेरोजगारी, ऐच्छिक बेरोजगारी आणि अनैच्छिक बेरोजगारी असे प्रकार आहेत. बेरोजगारीच्या निर्मितीचे कारण सुद्धा वेगवेगळे असतात. बेरोजगारी निर्मितीची कारणे आर्थिक, सामाजिक, वैयक्तिक करणे अशा अनेक कारणांमुळे दिवसेंदिवस वाढती बेरोजगारी ही समस्या निर्माण झालेली आहे. शासकीय पातळीवर विविध उपाय अमलात आल्यास बेरोजगारीच्या समस्येची तीव्रता कमी होऊ शकते. रोजगारी संधीची निर्मिती करणे हेच प्रत्येक सत्तारूढ पक्षाच्या सरकारचे धोरण असते. परंतु सरकारचे धोरणात कोणत्या गोष्टींना प्राधान्य द्यायचे. यासंबंधीचे अग्रक्रम द्यायचे चुकीचे असू शकतात. असे अन्य राजकीय पक्षांना व काही तज्ञांना वाटते. म्हणून आर्थिक विकासाच्या कार्याचे अग्रक्रम व्यापक सहमतीने निश्चित झाल्यास बेरोजगारीची समस्येची तीव्रता कमी होऊ शकते असे म्हणता येईल.

**संदर्भ सूची**

1. प्रा. प्रदीप आगलावे : सामाजिक समस्या, श्री साईनाथ प्रकाशन, भगवाघर कॉम्प्लेक्स धरमपेठ नागपूर.
2. प्रा.रा.ज. लोटे, प्रा. डॉ. ए. डी.चौहान : भारतातील सामाजिक समस्या, 'पिंपळापुरे अँड कं.पब्लिशर्स नागपूर.
3. राम अहूजा : "सामाजिक समस्याए", 'रावत पब्लिकेशन्स', जवाहरलाल नगर जयपूर.
4. प्रो. एम. एल. गुप्ता, डॉ. डी. शर्मा : "समकालीन भारत मे सामाजिक समस्या", साहित्य भवन पब्लिकेशन्स, आग्रा.
5. प्रा. एस. एन. गंदेवार, विद्याभारती प्रकाशन, विद्याभारती गीतांजली मार्केट, मेन रोड लातूर.
5. इंटरनेट, गूगल.
6. सीएमआयई अहवाल.